# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः09.01.2026** **वारःशुक्रवार**

1. भारतीय एआय मॉडेल विकसित करण्यावर भर देण्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं आवाहन
2. अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता 25 हजार रुपये बक्षीस मिळणार
3. राज्यभरात महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी; विविध पक्षांकडून जाहीरनाम्याची घोषणा आणि
4. ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ डॉ माधव गाडगीळ यांच्यावर पुण्यात अंत्यसंस्कार; विविध मान्यवरांकडून शोक व्यक्त

**एआय स्टार्ट-अप्स**

मेड इन इंडिया आणि मेड फॉर द वर्ल्डच्या भावनेचं प्रतिक असलेलं आणि नैतिक, पारदर्शक तसंच गोपनीयतेच्या तत्त्वांवर आधारित; असं भारतीय एआय मॉडेल तयार करावं, असं आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. पंतप्रधानांच्या अध्यक्षतेखाली काल नवी दिल्लीतील त्यांच्या निवासस्थानी भारतीय एआय स्टार्ट-अप्स गोलमेज परिषद झाली. पुढील महिन्यात भारतात होणाऱ्या 'इंडिया एआय इम्पॅक्ट समिट 2026' पूर्वी, 'एआय फॉर ऑल: ग्लोबल इम्पॅक्ट चॅलेंज'साठी पात्र ठरलेल्या 12 भारतीय एआय स्टार्ट-अप्सनी या गोलमेज परिषदेत भाग घेतला. या बैठकीत स्टार्ट-अप्सनी आपल्या कल्पना आणि कामाचं सादरीकरण केलं.

**गडकरी**

अपघातग्रस्तांना तातडीने रुग्णालयात पोहोचवणाऱ्या व्यक्तीला आता 25 हजार रुपये बक्षीस मिळणार आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी काल दिल्लीत पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. अपघातातील जखमी व्यक्तीला रोखरहित उपचार दिले जाणार असल्याचंही गडकरी यांनी सांगितलं. नितीन गडकरी यांनी काल सर्व राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांच्या परिवहन मंत्र्यांची वार्षिक बैठक घेतली. रस्ते वाहतुकीत सुरक्षा, प्रवाशांच्या आणि सर्वसामान्यांची सोय, व्यवसायानुकूल वातावरण आणि वाहनविषयक नियम अशा विविध विषयांवर बैठकीत चर्चा झाली. परिवहन हा विषय राज्य आणि केंद्राच्या समावर्ती सूचीतला आहे; त्यामुळे अशा प्रकारचा संवाद सक्षम, सुरक्षित आणि नागरिक केंद्रीत उपायांना पूरक ठरतो असं गडकरी यावेळी म्हणाले.

**प्रचार**

महानगरपालिका निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी राज्यभर सुरू जोरात आहे. विविध पक्षांचे नेते आणि उमेदवार जनतेशी थेट संवाद साधून आपापल्या पक्षाचा प्रचार करत आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस यांनी काल छत्रपती संभाजी नगर आणि अहिल्यानगर शहरात प्रचारसभा घेतली. 'अहिल्याबाई होळकर यांनी त्या काळात आपल्या राजधानीला ज्या पद्धतीने सुसज्य केलं त्याच पद्धतीने नगरलाही आम्ही सुसज्ज करणार असल्याचं' प्रतिपादन त्यांनी नगरमध्ये केलं.

केंद्रीय मंत्री आणि पुण्याचे खासदार मुरलीधर मोहोळ यांनी काल पुण्यात मेट्रो रेल्वेने प्रवास करतांना माध्यमांच्या प्रतिनिधींशी संवाद साधला. पुणे महानगरपालिकेत भारतीय जनता पक्षाची सत्ता असताना अनेक विकास कामे झाली; विरोधकांकडे भाजपवर टीका करण्यासाठी कोणताही मुद्दा शिल्लक राहिला नाही; पुणेकर हे सुज्ञ असून विकासाच्या बाजूने उभे राहतील असा विश्वास मोहोळ यांनी यावेळी व्यक्त केला.

पिंपरी चिंचवड मधील पिंपळे सौदागर या प्रभागातील उमेदवारांच्या प्रचारासाठी उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी पक्षाचे अध्यक्ष अजित पवार यांनी ज्येष्ठ नागरिकांशी संवाद साधला. विविध ठळक कामांबरोबरच ज्येष्ठ नागरिकांसाठी स्वतंत्र नाट्यगृह आणि विरंगुळा केंद्र उभारणी करण्याचं आश्वासन त्यानी दिलं. तत्पूर्वी सकाळी ख्रिश्चन बांधवांसोबत त्यांनी बैठक घेतली.

उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे प्रमुख नेते एकनाथ शिंदे यांनी काल मुंबईत जाहीर सभा घेतली. मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी वंचित बहुजन आघाडीने काल जाहीरनामा प्रसिद्ध केला. हा जाहीरनामा मुंबईच्या जनतेच्या वेदना, संघर्ष आणि आकांक्षांचा जाहीरनामा असल्याचं वंचित बहुजन आघाडीने म्हटलं आहे.

भारतीय संविधान आणि शाहू, फुले, आंबेडकर यांची विचारधारा टिकवण्यासाठी वंचित बहुजन आघाडी आणि त्यांच्या घटक पक्षांना निवडून द्यावं, असं आवाहन पक्षाचे नेते प्रकाश आंबेडकर यांनी काल सांगली इथल्या प्रचार सभेत केलं.

**भाजपा प्रवेश**

अंबरनाथ मधील कॉंग्रेसच्या 12 निलंबीत नगरसेवकांनी काल नवी मुंबईत कोपरखैरणे इथे भाजपमध्ये प्रवेश केला. यावेळी भाजपाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण आणि वनमंत्री गणेश नाईक उपस्थित होते.

**कॉंग्रेस जाहीरनामा**

पुणेकरांचा अधिकारनामा असलेला 'पुणे फर्स्ट' हा आघाडीचा जाहीरनामा काल कॉंग्रेस आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, आघाडीच्या वतीने पुण्यात कॉंग्रेस भवन इथे प्रकाशित करण्यात आला. पुणे महानगरपालिका निवडणूक ही आघाडी ताकदीने निवडणूक लढत असून, सत्ताधारी तीन पक्षांमुळे पुणे शहराचं मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आणि भ्रष्टाचार वाढल्याचा आरोप यावेळी करण्यात आला.

नवी मुंबई महानगरपालिका निवडणुकीसाठी काल भाजपाने जाहीरनामा प्रसिद्ध केला. पुढच्या वीस वर्षांत पाणी आणि मालमत्ता करात कोणतीही वाढ केली जाणार नाही, असं आश्वासन यात देण्यात आलं आहे. तर 'कुंभ पर्वातली अमृत वचन' या नावाने भाजपानं नाशिक महापालिकेसाठीचा जाहीरनामा काल प्रसिद्ध केला.

**सुट्टी**

राज्यातील 29 महानगरपालिकांच्या निवडणुकीसाठी येत्या गुरुवारी, दिनांक 15 जानेवारी सर्व संबंधित मतदान क्षेत्रात सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आल्याची अधिसूचना राज्य शासनाने प्रसिद्ध केली आहे. ही सार्वजनिक सुट्टी संबंधित महानगरपालिका निवडणूक क्षेत्रातील कामानिमित्त मतदारसंघाबाहेर असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे.

**माधव गाडगीळ निधन**

ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ज्ञ डॉ. माधव गाडगीळ यांच्या पार्थिव देहावर काल पुण्यात वैकुंठ स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. डॉक्टर गाडगीळ यांचं बुधवारी रात्री पुण्यात अल्पशा आजारानं निधन झालं. ते 83 वर्षांचे होते. देशातील पर्यावरणचळवळीला वैज्ञानिक दिशा देणारे माधव गाडगीळ यांनी पश्चिम घाटाच्या संरक्षणासाठी आयुष्यवेचलं. गाडगीळ यांच्या कार्याचा हा अल्प परिचय.....

**डॉ. माधव गाडगीळ यांचा जन्म 24 मे 1942 रोजी पुणे जिल्ह्यात झाला. पुण्यातल्या फर्ग्युसन महाविद्यालयात जीवशास्त्र याविषयात पदवी; आणि मुंबई विद्यापीठातून प्राणीशास्त्रात पदव्युत्तर पदवी मिळवल्यानंतर 70 च्या दशकात त्यांनी हार्वड विद्यापीठात Mathematical Ecology या विषयात पीएचडी प्राप्त केली.**

**Indian Institute of Science मध्ये त्यांनी 1973 ते 2004 दरम्यान उल्लेखनीय काम केलं, 1983 मध्ये त्यांच्या नेतृत्वाखाली Centre for Ecological Science ची स्थापना झाली. पंतप्रधानांची वैज्ञानिक सल्लागार परिषद, राष्ट्रीय सल्लागार परिषद आणि राष्ट्रीय व्याघ्र संवर्धन प्राधिकरणासह अनेक उच्चस्तरीय राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय संस्थांमध्ये त्यांनी काम केलं. पर्यावरण, जैवविविधतेचं संवर्धन, अशा विविध क्षेत्रात गाडगीळ यांनी दोनशेहून जास्त अभ्यासपूर्ण लेख, अनेक शोधनिबंध आणि पुस्तकं लिहिली. पश्चिम घाटातली जैवविधता जपण्यासाठी; त्याचं संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी डॉ. माधव गाडगीळ यांच्या अध्यक्षतेखालच्या तज्ञ समितीनं तयार केलेला 'गाडगीळ अहवाल' महत्वाचा ठरला.**

**पश्चिम घाटामध्ये स्थानिक समाजाला बरोबर घेऊन त्यांनी चार दशकं सातत्यानं काम केलं. देशाच्या इशान्येकडील जैवविविधतेचाही स्थानिक लोकांना बरोबर घेऊन त्यांनी अभ्यास केला. पर्यावरणाच्या क्षेत्रातील त्यांच्या योगदानाची दखल घेऊन भारत सरकारनं गाडगीळ यांना पद्मश्री आणि पद्मभूषण देऊन त्यांचा सन्मान केला. संयुक्त राष्ट्र संघाच्या 'चॅम्पियन ऑफ दअर्थ' पुरस्कारानं त्यांना गौरवण्यात आलं. शांतीस्वरूप भटनागर पुरस्कारासह विविध पुरस्करांनी त्यांना सन्मानित केलं गेलं. पर्यावरण संतुलनाच्या क्षेत्रासाठी आयुष्य वेचणारे डॉ. माधव गाडगीळ यांच्या निधनाबद्दल सर्व स्तरातून शोक व्यक्त होत आहेत. राज्यपाल आचार्य देवव्रत, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांनी गाडगीळ यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे. आकाशवाणी बातम्यांसाठी राजेंद्र लेले पुणे.**

**स्वाभिमान पर्व**

ज्योतिर्लिंगामधील आद्य ज्योतिर्लिंग असलेल्या सोमनाथ मंदिरावर 1026 मध्ये गझनीच्या महमूदने केलेल्या पहिल्या आक्रमणाला या वर्षी एक हजार वर्षे पूर्ण होत आहेत; 1951 मध्ये या मंदिराचा जीर्णोद्धार झाला; त्यालाही यंदा 75 वर्षे पूर्ण होणार आहेत. या प्रीत्यर्थ चार दिवसांच्या 'सोमनाथ स्वाभिमान पर्व' उत्सवाला काल गुजरातच्या समुद्रकिनारी असलेल्या प्रभास पट्टण या शहरात सुरुवात झाली.

संपूर्ण गुजरातभरातील सुमारे 2500 ऋषिकुमार या अखंड वैदिक मंत्रोच्चारासाठी समुद्रकिनाऱ्यावर जमले होते. यावेळी देशभरातली शिवमंदिरे एकाच वेळी मंत्रोच्चारात सहभागी झाली होती. 3 हजार ड्रोन असलेला ड्रोन-शो, 72 तासांचा 'ओमकार नाद' आणि भव्य 'शौर्य यात्रा' ही उद्घाटन पर्वाची वैशिष्ट्य होती. पंतप्रधान येत्या रविवारी 'सोमनाथ स्वाभिमान पर्वा' मध्ये सहभागी होणार आहेत.

**खेलो इंडिया**

दीव मध्ये दुसऱ्या पर्वातील खेलो इंडिया बीच स्पर्धा सुरू आहेत. काल पुरूषांच्या बीच सॉकरमध्ये अंदमान आणि निकोबारला हरवून महाराष्ट्राने उपांत्य फेरीत मुसंडी मारली. पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राने 2 रौप्य पदकांची कमाई करीत दिवस गाजविला. पेंचक सिलटमधील रेगु प्रकारात महाराष्ट्राच्या दोन्ही संघाने रूपेरी यश संपादन केले. मात्र महिलांच्या सांघिक प्रकारात ओरीसाकडून 580-576 गुणांनी पराभव स्वीकारावा लागला. महाराष्ट्राच्या जयश्री शेटे, क्रिनाशी येवले आणि अशिता यादवने रौप्य पदक मिळवले. पुरूषांच्या सांघिक प्रकारात तामिळनाडूने 606 गुण तर महाराष्ट्राने 757 गुण संपादून अनुक्रमे सुवर्ण आणि रौप्य पदके जिंकली. महाराष्ट्राकडून अंशुल कांबळे, अनुज सरनाईक आणि मुकेश चौधरीने रूपेरी यशावर नाव कोरले,

**हवामान**

राज्याच्या काही भागात थंडीचा जोर पुन्हा वाढला आहे. काल पुण्यात सर्वात कमी 9 पूर्णांक 5 दशांश अंश सेल्सियस किमान तापमानाची नोंद झाली. येत्या 24 तासात संपूर्ण राज्यात कोरडं हवामान राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.